**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA**
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 **website :** www.unishivaji.ac.in

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४ – महाराष्ट्र**
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० **सांख्यिकी कक्ष** : ०२३१– २६०९१४७.
फॅक्स : ००९१–२३१–२६९३२९४. **E-Mail :** statcell@unishivaji.ac.in

**Estd : 1962**
**NAAC 'A' Grade**
**MHRD-NIRF – 28th Rank**

**जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एमआयएस/** 6127 **दिनांक :** 5 OCT 2016

# परिपत्रक

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था**
(अव्यावसायिक महाविद्यालये)

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS)**
वेबपोर्टलवर सन २०१६-१७ या वर्षाची माहिती नोंदणेबाबत...

**संदर्भ : १. क्र. उशिसं/ सांख्यिकी/एआयएसएचई/२०१६-१७/१०९५७,**
**दिनांक २३/०९/२०१६ रोजीचे मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र.**
**२. क्र. उशिसं/ सांख्यिकी/एआयएसएचई/२०१६-१७/९३९७,**
**दिनांक ०८/०८/२०१६ रोजीचे मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकिंत पत्रास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, शिक्षण संचालनालयाकडुन सन २०१६-१७ हया वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित अव्यावसायिक महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०१६-१७ करीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यंतची माहिती एमआयएस वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

सदरची माहिती दिनांक ३०/११/२०१६ पर्यत माहिती नोंदणीचे काम संलग्नित महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी निश्चितपणे पूर्ण करावयाचे आहे. आपल्या महाविद्यालयांचे एमआयएस नोडल अधिकारी जी महाविद्यालयांची माहिती वेबपोर्टलवर नोंद करतात ती माहिती वेबपोर्टलव्दारे संकलित करून माहिती मा. मंत्री महोदय व शासनाला धोरणात्मक निर्णय घेताना उपयोगी पडत असल्यामुळे आपण वेबपोर्टलवर नोंद करत असलेली माहिती बिनचूक नोंद करावयाची आहे. माहिती नोंद केल्यानंतर पत्रा सोबत जोडलेले प्रमाणपत्रावर प्राचार्याची स्वाक्षरी घेवुन ते प्रमाणपत्र महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्षाकडे सादर करावयाचे आहे. (सोबत प्रमाणपत्राचा नमुना जोडलेला आहे.)

महाविद्यालयांच्या प्राचार्यानी सदर बाब आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांच्या निर्देशनास आणुन त्याप्रमाणे त्यांच्याकडुन त्वरीत कार्यवाही करून घ्यावी. ही विनंती.

एमआयएस वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांना सांख्यिकी कक्ष,(खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर . दूरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.

कळावे.

आपला विश्वासु,

**संचालक,**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

(महाविद्यालयाने द्यावयाचे प्रमाणपत्र)

# -: प्रमाणपत्र :-

महाविद्यालयाचे नाव :

महाविद्यालयाचा पत्ता :

एआयएसएचई संकेतांक :

प्रमाणित करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस.) आणि अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई) सन २०१६-१७ या दोन्ही वेबपोर्टलवर महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

दिनांक : / /२०१ स्वाक्षरी :

ठिकाण : प्राचार्याचे नाव :

संस्थेचे नाव :

शिक्का :